क्र.का-७/विवाह/प्रकरण ३७/८५/३०-७१
महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,पुणे
दिनांक : ३०/४/८५

## -: परिपत्रक :-

धर्माने ख्रिश्चन असलेल्या वधूने व वराने सही केलेली आणि क्लर्जिमन किंवा मिनीस्टर ऑफ रिलीजन यांनी पुरोहीत म्हणून सही केलेली विवाह विज्ञप्ती, विवाह निबंधकाचे, मुंबई विवाह नोंदणी अधिनियम १९५३ (१९५४ चा ५वा) च्या कलम ५ अन्वये स्वीकारून नोंदणी करावी किंवा नये असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. याबाबत खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

२. ख्रिस्ती लोकांचे विवाह हे भारतीय ख्रिश्चन विवाह औद्योगिक १८७२ (१८७२ चा १५ वा) मधील तरतुदीनुसार केले जातात. या अधिनियमाच्या कलम ५ अन्वये ख्रिश्चन धर्मातील लोकांचे विवाह खालील व्यक्ती सामने करतात.

१. धर्मपिठाच्या आदेश प्राप्त असलेले चर्चचे मिनिस्टर

२. स्कॉटलँड चर्चने क्लर्जिमन

३. या अधिनियमानुसार अनुज्ञप्ती मिळालेले मिनिस्टर ऑफ रिलीजन

४. या अधिनियमानुसार नियुक्त केलेले विवाह निबंधक.

५. नेटिव्ह ख्रिश्चनांना प्रमाणपत्र देण्यासाठी या अधिनियमान्वये अनुज्ञप्ती मिळवलेल्या व्यक्ती.

जेव्हा वरील अधिनियमाच्या कलम १० किंवा २५ किंवा ५१ अन्वये ख्रिश्चन लोकांचा विवाह संपन्न करण्यात येतो तेव्हा तो विवाह प्रर्वचित अधिनियमाच्या कलम २८ किंवा ३० किंवा ३१ किंवा ३२ किंवा ३७ किंवा ५४ किंवा ६१ अन्वये विवाह संपन्न करणाऱ्या वरील व्यक्तीकडून नोंदला

जातो. आणि त्यानी एक प्रत किंवा त्या संबंधीचे विवरण मात्र महानिबंधक जन्म, मृत्यू व विवाह यांचेकडे सदर अधिनियमातील कलम २९ किंवा ३० किंवा ३४ किंवा ३७ किंवा ५५ किंवा ६२ अन्वये सादर करतात.

३. विशेष विवाह अधिनियम १९५४, -----

भारतीय ख्रिश्चन विवाह अधिनियम १८७२ व

शर्ती विवाह व घटस्फोट अधिनियम १९३६ या खाली संपन्न झालेल्या विवाहांस मुंबअी विवाह नोंदणी अधिनियम १९५३ लागू नाही अशी तरतूद त्यामधील कलम १४ मध्ये केलेली आहे. याचे प्रामुख्याने कारण असे आहे की वर नमूद केलेल्या अधिनियमाप्रमाणे सदर विवाह त्या त्या अधिनियमान्वये नोंदलेले असतात व त्याचे प्रमाणपत्र किंवा अभिलेख महानिबंधक, जन्म, मृत्यू व विवाह यांचेकडे झालेले असतात. त्यामुळे त्यांची मुंबअी विवाह नोंदणी अधिनियम १९५३ अन्वये पुननोंदणी करण्याची आवश्यकता नाही.

४. जर मुंबअी विवाह नोंदणी कायदा १९५३ (१९५४ चा ५ वा) अन्वये नेमणूक विवाह निबंधकाकडे इत्यादी खिश्चन लोकांच्या विवाहाशी विज्ञप्ती दाखल झाली तर त्यावर त्या व्यक्तीने पुरोहीत म्हणून सही केली आहे अशी व्यक्ती.

१) धर्मपिठाच्या आदेश प्राप्त झालेले चर्चचे मिनिस्टर.

२) स्कॉटलॅण्ड चर्चचे क्लर्जियन

३) भारतीय ख्रिश्चन विवाह अधिनियमानुसार अनुज्ञप्ती मिळालेले मिनिस्टर ऑफ रिजलन.

४) सदर अधिनियमानुसार नियुक्त केलेली विवाह निबंधक

५) नेटिव्ह ख्रिश्चनांना विवाह प्रमाणपत्र देण्यासाठी सदर अधिनियमान्वये अनुज्ञप्ती मिळालेल्या व्यक्ती. यापैकी आहे काय याची विवाह नोंदणी अधिकाऱ्यांने प्रथम खात्री करुन घेणे जरुर आहे.

५.	जर तसे असेल तर सदर विवाह निबंधक यांनी सदरची विवाह विज्ञप्ती दाखल करुन घेऊ नये. परंतु संबंधित प्रकारात असे सांगावे की हा विवाह भारतीय ख्रिश्चन अधिनियम १९५३ अन्वये अगोदरच नोंदलेला असल्याने त्याची मुंबअी विवाह नोंदणी अधिनियम अन्वये पुर्ननोदंणी करण्याची आवश्यकता नाही.

६.	याउलट जर विवाह संपन्न करणारी व्यक्ती वरील पैकी अधिकाऱ्यांपैकी नसेल तर विवाह भारतीय ख्रिश्चन अधिनियमान्वये संपन्न झालेला विवाह नाही व अशा विवाहासंबंधी विवाह विज्ञप्ती विवाह निबंधक यांनी नोंदणीसाठी दाखल करुन घ्यावी.

७.	त्याचप्रमाणे जर नोंदणीसाठी सादर केलेली विवाह विज्ञप्ती असे दर्शवित असेल की सदरचा विवाह हा विवाह नोंदणी अधिनियम १९५४ अन्वये संपन्न झालेला किंवा नोंदलेला आहे तर तो परत करण्यात यावा. कारण सदरचा विवाह हा त्या अधिकारान्वये पूर्वीच नोंदलेला आहे. त्याची मुंबई विवाह नोंदणी अधिनियम १९०५३ अन्वये पुर्ननोंदणीची आवश्यकता नाही.

८.	जर नोंदणीसाठी दाखल केलेली विवाह विज्ञप्ती असे दर्शवित असेल की सदर विवाह लोकांमध्ये झालेला विवाह आहे तर सदरचा विवाहाचे प्रमाणपत्र पार्शी विवाह व घटस्फोट अधिनियम १९३६ च्या कलम ६ अन्वये पारशी विवाह निबंधकाकडे पाठविले आहे काय याची चौकशी करावी. जर असे आढळून आले तर विवाह निबंधकांनी सदर विवाह विज्ञप्ती सत्वर परत करावी.